वर्ष : ०४ | अंक: १० | मुंबई, मंगळवार ३० जानेवारी २०१८ ते ५ फेब्रुवारी २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 लाइफलाइन की मृत्यूचा सापळा?

3 → महागाईच्या वणव्याकडे

महाराष्ट्राचा चित्ररथ अव्वल! ← 4


# 'खांद्यावर घेतलेल्या भाजपनेच कानात घाण केली'




**मुंबई - 'शिवसेनेने महाराष्ट्रात भाजपला खांद्यावर घेऊन फिरवले व त्याच खांद्यावर बसून शिवसेनेच्याच कानात घाण करण्याचा प्रयत्न भाजपने केला,' अशी टीका करतानाच 'आता आंध्रच्या चंद्राबाबूंनीही तोच अनुभव कथन केला. चंद्राबाबू हे तर पंतप्रधान मोदींचे प्रिय पात्रच होते, पण चंद्राबाबूंनीही 'लव्ह जिहाद' मोडून स्वाभिमानाचा जिहाद पुकारला आहे. २०१९ च्या राजकारणास नवे वळण देणारे हे असे सुरुंग फुटत आहेत,' असा इशारा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपला दिला आहे.**

तेलुगू देसमचे नेते आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी भाजपविरोधात जाहीर नाराजी व्यक्त केल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी तोच धागा पकडून शिवसेनेचं मुखपत्र असलेल्या दैनिक 'सामना'च्या अग्रलेखातून भाजपवर निशाणा साधला आहे. 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी ही एका चांगल्या विचाराने बांधलेली मोट होती. ती टिकावी व काँग्रेसला आजन्म पर्याय उभा करावा ही आमची भूमिका होतीच. अत्यंत संकटकाळातही 'रालोआ' टिकवून ठेवण्यासाठी शिवसेनेने शर्थ केली, पण आता भाजपने ३८० ते ४०० खासदारांचे 'टार्गेट' स्वबळावर ठेवल्याने त्यांना शुभेच्छा देण्याशिवाय आमच्या हाती दुसरे काय आहे?,' असा टोलाही उद्धव यांनी लगावला आहे.

हिंदुस्थानातील ६०० कोटी जनतेने भारतीय जनता पक्षाला मतदान करून सत्तेवर आणले असे मोदी जागतिक व्यासपीठावर बोलले. त्यामुळे मित्रवर्यांनी आमच्या फायद्यातोट्याची चिंता करू नये. तुमचे ६०० कोटी मतदार सांभाळा. कारण हिंदुस्थानची लोकसंख्या १२५ कोटी आहे. त्यामुळे उरलेले पावणेचारशे कोटी मतदार हे चंद्रावर किंवा मंगळावर आहेत व ते भाजपलाच मतदान करतात असा दावा असल्याने तिथेही आता पोहोचावे लागेल. कारण देशाच्या राजकारणात त्यांना 'युती'साठी चांगले मित्र मिळणार नाहीत. त्यामुळे परग्रहावरचेच मित्र शोधावे लागतील, असा टोलाही उद्धव यांनी लगावला आहे.



# देशातलं सर्वात महाग पेट्रोल मुंबईत



## ८० रुपयांचा टप्पा ओलांडला

*मुंबई : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत पेट्रोलने ८० रुपये प्रती लिटरचा टप्पा ओलांडला आहे. मुंबईतील पेट्रोलचे आजचे दर ८०.१० रुपये प्रती लिटर आहेत. पेट्रोल ८० रुपयांच्या वर जाण्याची मुंबईतील ही पहिलीच वेळ आहे. शिवाय या वर्षातली ही सर्वात मोठी वाढ आहे. मुंबईत पेट्रोल ८० रुपये १० पैसे प्रती लिटर, तर डिझेल ६७ रुपये १० पैसे प्रती लिटर आहे. दररोज पेट्रोल आणि डिझेलचे दर बदलत असल्याने ही वाढ लक्षात येत नाही. मात्र गेल्या वर्षभरात पेट्रोलच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. या वर्षाच्या सुरुवातीलाच पेट्रोलने ८० रुपयांचा टप्पा ओलांडला आहे.*

### इतर शहरांची परिस्थती

- राजधानी दिल्लीत पेट्रोलचे दर ७२ रुपये २३ पैसे प्रती लिटर, तर डिझेल ६३ रुपये ०१ पैसे प्रती लिटर आहे.
- लखनौमध्ये पेट्रोल ७३ रुपये ९४ पैसे, तर डिझेल ६३ रुपये ४६ पैसे प्रती लिटर आहे.
- बिहारची राजधानी पाटणामध्ये पेट्रोल ७६ रुपये ५५ पैसे, तर डिझेल ६६ रुपये ७६ पैसे प्रती लिटर आहे.
- मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्ये पेट्रोल ७७ रुपये २३ पैसे, तर डिझेल ६५ रुपये ८९ पैसे प्रती लिटर आहे.
- राजस्थानची राजधानी जयपूरमध्ये पेट्रोल ७५ रुपये १८ पैसे, तर डिझेल ६७ रुपये ४६ पैसे प्रती लिटर आहे.
- चंदीगडमध्ये पेट्रोल ६९ रुपये ४७ पैसे, तर डिझेल ६१ रुपये १७ पैसे प्रती लिटर आहे.
- अहमदाबादमध्ये पेट्रोल ७१ रुपये ८३ पैसे, तर डिझेल ६७ रुपये ८३ पैसे प्रती लिटर आहे.

# हिंदू हृदय सम्राट श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म दिवसाच्या निमित्त मिरभाईंदरमध्ये 'आश्रय ट्रस्ट' संस्थेद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन






छाया: विनोद मेढे

**हिंदू हृदय सम्राट श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म दिवसाच्या निमित्याने मिराभाईदर मूनसिपाल शाळा नावघर रोड हनुमान मंदिर समोरील पटांगणात आश्रय ट्रस्ट आयोजित जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस आणि जेष्ठ नागरिक विरंगुळा संस्थेस कै. मालती मोरेश्वर नाईक यांच्या स्मरणार्थ स्टीलचे कपाट देण्यात आले आणि कै. मनोहर गुणाजी खामकर यांच्या स्मरणार्थ सर्व जेष्ठ नागरिकांना जेवणाची पाकिटे देण्यात आली त्याच प्रमाणे सिनिअर सिटीझन सोशल राईट्स संस्थे मार्फत विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावलेल्या जेष्ठ नागरिकांना प्रशस्ती पत्रक वाटण्यात आली यावेळी**

उर्वरित पृष्ठ 4 वर

# काबूल पुन्हा हादरले ९५ ठार



**काबूल** - काबूल शहरातील अत्यंत गजबजलेल्या परिसरांत एका आत्मघातकी हल्लेखोराने स्फोटकांनी खच्चून भरलेल्या एका रुग्णवाहिकेचा स्फोट घडविला. त्यामध्ये किमान ९५ जण ठार झाले असून अन्य १५८ जण जखमी झाले आहेत. या हल्ल्याची जबाबदारी तालिबानने स्वीकारली आहे. रुग्णालयात आणण्यात आलेल्या काही जखमींची स्थिती चिंताजनक असल्याने मृतांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.


गेल्या वर्षी मे महिन्यांत घडविण्यात आलेल्या स्फोटानंतरचा हा मोठा स्फोट आहे. स्फोट होताच परिसरात एकच हाहाकार माजला, भयभीत नागरिक घटनास्थळाहून पळून गेले. या परिसरांत युरोपीय समुदायासह अनेक उच्च संघटनांची कार्यालये आहेत. स्फोट झाल्यानंतर नजीकच असलेल्या जमुरियत रुग्णालयात मृतदेहांचा खच पडल्याचे आणि रक्तबंबाळ महिला, पुरुष आणि मुलांवर उपचार करताना तेथील वैद्यकीय कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाल्याचे चित्र पाहावयास मिळत होते. रुग्णालयातून देण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, या स्फोटांत आतापर्यंत ९५ जण ठार झाल्याचे तर १५८ जण जखमी झाल्याचे आरोग्य मंत्रालयाचे प्रवक्ते वाहीद मजरोह यांनी सांगितले. या स्फोटाची तीव्रता इतकी होती की दोन कि.मी. अंतरावरील इमारतींना हादरे बसले तर १०० मीटर परिसरात असलेल्या इमारतींच्या खिडक्या तुटल्या.

## सौजन्य व्हॉट्सअप




# कमला मिल आग; पालिका अधिकाऱ्यांना आम्ही लाच दिली!

**मुंबई - मुंबई महापालिकेतील लाचखोरी मुंबईकरांना नवी नाही. मात्र पाकीट मिळाले की लोकांच्या जीवावर बेतणाऱ्या परवानग्याही कशा दिल्या जातात याचाच एक धक्कादायक खुलासा झाला आहे. तब्बल १४ जणांचे बळी घेणाऱ्या कमला मिल दुर्घटनेप्रकरणी अटक करण्यात आलेल्या वन अबव्ह आणि मोजोस बिस्त्रो या दोन्ही रेस्ट्रो बारच्या मालकांनी पालिका अधिकाऱ्यांना वेळोवेळी लाच दिल्याची कबुली दिली आहे.**



अनियमिततांबद्दल आम्हाला वेळोवेळी नोटीस बजावण्यात येत होती. मात्र प्रत्येक वेळी आम्ही अधिकाऱ्यांना लाच दिली, असे दोन्ही हॉटेलच्या मालकांनी म्हटले आहे. अटक करण्यात आलेल्या मालकांनी जी साऊथ वॉर्डच्या अधिकाऱ्यांची नावेही सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली. भरपूर लाच घेतलेल्या तीन ते चार अधिकाऱ्यांची नावे आम्हाला सांगण्यात आली असून, आम्ही या दाव्याचा शहानिशा करीत आहोत, असे एका अधिकाऱ्याने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर सांगितले.

पोलिसांनी या प्रकरणी डझनभराहून अधिक पालिका अधिकाऱ्यांचे जबाब नोंदवून घेतले आहेत. कमला मिलमधील अनियमिततांकडे कोणत्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले याची कसून चौकशी करण्यात येत आहे. पालिका प्रशासनाने दोन्ही हॉटेल्सना १० ते १२ नोटिसा बजावल्या होत्या. मात्र तरीही दोन्ही हॉटेल्स सुरळीत सुरू होती. ज्या अधिकाऱ्यांची नावे आरोपींनी घेतली आहेत, त्यांच्याविरोधात सबळ पुरावे मिळाले तर कुणाचाही मुलाहिजा न ठेवता आयपीएससीच्या कलम ३०४ अंतर्गत (सदोष मनुष्यवधाचा गुन्हा) कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले. दोन्ही हॉटेल्सच्या मालकांवर याच कलमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

पालिकेतील एका अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, लाच घेतलीच नाही, असे म्हणता येणार नाही. मात्र तो आता तपासाचा भाग आहे. पोलिसांना हा आरोप सिद्ध करण्यासाठी पुरावे गोळा करावे लागतील. यापूर्वीही असे आरोप झाले आहेत, त्यानंतर पाच अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. महापालिका आयुक्तांनीही आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला असून, १० अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची शिफारस केली आहे. १ अबव्हला नाहरकत प्रमाणपत्र दिल्याबद्दल अग्निशमन विभागाचे अधिकारी राजेंद्र पाटील यांना गेल्याच आठवड्यात अटक करण्यात आली आहे. एन एम जोशी मार्ग पोलीस स्थानकातील अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार या दोन रेस्ट्रो बार्सविरोधात खुपवेळा तक्रारी करण्यात आल्या होत्या. निर्धारित कालावधीपेक्षा अधिक काळ हॉटेल सुरु ठेवणे, जेवण्याच्या ठिकाणी हुक्का देणे, मोठ्या आवाजात संगीत लावणे, अशा स्वरुपाच्या तक्रारींचा त्यात समावेश होता. वन अबव्ह विरोधात तर ९ वेळा गुन्हे दाखल झाले आहेत. यात तीनवेळा कोप्टा अंतर्गत, मोठ्या आवाजात गाणी लावल्याबद्दल पाचवेळा आणि हुक्का दिल्याबद्दल गुन्हा दाखल झाला आहे.

# लाइफलाइन की मृत्यूचा सापळा?

## मुंबईत २०१७ मध्ये ३ हजार प्रवासी ट्रॅकवर ठार



**मुंबई - मुंबईच्या लोकलला मुंबईची लाइफलाइन असे म्हटले जाते. मात्र ही लाइफलाइन आहे की मृत्यूचा सापळा असाच प्रश्न आता पडला आहे. कारण २०१७ या वर्षात थोड्या थोडक्या नाही तर ३ हजार १४ प्रवाशांना रेल्वे ट्रॅकवर त्यांचा प्राण गमवावा लागल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. माहितीच्या अधिकारात ही माहिती समोर आली आहे. सरकारी रेल्वे पोलीस (GRP) यांनी दिलेल्या माहितीनुसार ३०१४ प्रवाशांनी २०१७ या वर्षात प्राण गमावले.**

विविध रेल्वे अपघातांमध्ये हे मृत्यू झाले आहेत. आरटीआय कार्यकर्ते समीर जव्हेरी यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मिळण्यासाठी या संदर्भातला अर्ज केला होता. त्याला उत्तर देतानाच २०१७ या वर्षात ३०१४ प्रवाशांना विविध अपघातात प्राण गमवावे लागल्याचे



रेल्वे पोलिसांनी सांगितले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार आत्महत्या, लोकलमधून खाली पडणे आणि बेकादेशीरपणे रेल्वे रूळ ओलांडताना झालेले मृत्यू ही या आकडेवारीमागची मुख्य तीन कारणे आहेत. २०१७ या वर्षात मध्य, हार्बर आणि पश्चिम रेल्वे मार्गावर १६५१ लोकांना रेल्वे रूळ ओलांडताना त्यांचे प्राण गमवावे लागले. या १६५१ लोकांमध्ये १४६७ पुरुष आणि १८४ महिलांचा समावेश आहे. तर ६५४ प्रवासी ट्रेनमधून पडून त्यांचा मृत्यू झाला. या ६५४ प्रवाशांमध्ये ५८ महिलांचा समावेश होता असेही समोर आले आहे.

जीआरपीचे पोलीस अधिकारी मच्छिंद्र चव्हाण यांनी 'पीटीआय' या वृत्तसंस्थेला ही प्रतिक्रिया दिली. रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या होतात त्या नियंत्रणात आणणे शक्य नाही. मात्र लोकलमधून खाली पडून मृत्यू आणि रेल्वे रुळ ओलांडताना झालेले मृत्यू यांचे प्रमाण कमी होऊ शकते किंवा टाळताही येऊ शकते असेही मत चव्हाण यांनी मांडले.

प्रवासी एकापाठोपाठ एक ट्रॅक ओलांडतात आणि त्यानंतर सुरु झालेली ट्रेन पकडण्याचा प्रयत्न करतात. नुकताच मराठी मालिकांमध्ये काम करणारा अभिनेता प्रफुल भालेराव याचा जीवही अशाच घाईमुळे गेला. प्रवाशांनी प्रवास करताना या चुका टाळायला हव्यात असेही चव्हाण यांनी म्हटले आहे.

मध्य रेल्वे मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, भायखळा आणि दादर या गजबजलेल्या आणि गर्दी असणाऱ्या स्टेशन्स दरम्यान १५३४ मृत्यू झाले अशीही माहिती समोर आली आहे. तर पश्चिम रेल्वे मार्गावरच्या चर्चगेट, अंधेरी, बांद्रा आणि बोरिवली या गजबजलेल्या स्टेशन्सवर २०१७ या वर्षात १०८६ मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. एकट्या बोरिवली स्टेशनवर गेल्या वर्षात ७६ मृत्यू झाले आहेत.

हार्बर मार्गावर गेल्या वर्षात ३९४ प्रवाशांना त्यांचा प्राण गमवावा लागल्याची माहिती माहितीच्या अधिकारात समोर आली आहे. तर ३६ लोकांनी गेल्या वर्षभरात ट्रेनखाली उडी मारून जीव दिला अशीही माहिती समोर आली आहे. या ३६ जणांमध्ये सहा महिलांचा समावेश होता.

दरम्यान २०१७ या वर्षात पश्चिम रेल्वे मार्गावर १५४० प्रवासी जखमी झाले आहेत. तर मध्य रेल्वे मार्गावर याच वर्षात १४३५ प्रवासी जखमी झाले आहेत. सरासरी रोज ९ मृत्यू दररोज होत आहेत. प्रवाशांनी नियम मोडून ट्रॅक क्रॉस करू नये किंवा गर्दी असलेल्या लोकलमध्ये चढण्याची घाई करू नये म्हणून आम्ही विविध उपाय योजना करत आहोत. रेल्वेच्या डब्यात आम्ही या संदर्भातले स्टिकर्स लावून आणि रेल्वे स्थानकांवर या संदर्भातले बॅनर लावून जनजागृती करण्याचा प्रयत्न करतो आहोत अशीही माहिती चव्हाण यांनी दिली.

# नशेसाठी औषधांचा वाढता वापर उघड

## *अल्प्राझोलम, कोरेक्सचा साठा हस्तगत*

**मुंबई - एकीकडे शहरातील तरुणवर्गात अमली पदार्थाचे व्यसन वाढत चालल्याचे समोर येत असताना आता ठरावीक औषधांचाही नशेसाठी वापर होऊ लागल्याने पोलीसही बुचकळयात पडले आहेत. अमली पदार्थविरोधी पथकाने अलीकडेच वाडीबंदर परिसरात छापा घालून अल्प्राझोलमच्या सुमारे ८० हजार गोळया हस्तगत केल्या. या गोळयांची विक्री करणाऱ्या दोन महिलांना पथकाने अटक केली आहे. गोळया विकत घेणाऱ्यांमध्ये शाळा-महाविद्यालयातील युवकांचे प्रमाण जास्त असल्याची माहिती दोघींच्या चौकशीतून समोर आली आहे.**

अल्प्राझोलम गोळयांचा वापर मानसिक विकारांवरील उपचारांमध्ये होतो. या गोळयांमुळे झोप येण्यास मदत होते. मात्र प्रमाणापेक्षा जास्त गोळयांचे एकाच वेळेस सेवन केल्यास जिवावर बेतू शकते. त्यामुळे औषधांच्या दुकानात डॉक्टरच्या चिठ्ठीशिवाय या गोळया विकल्या जात नाहीत. मात्र या गोळयांचा नशेसाठी वापर केला जात असल्याचे उघड झाले आहे. वाडीबंदर परिसरात या गोळयांची खुलेआम विक्री होते, अशी माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाच्या आझाद मैदान कक्षाला मिळाली होती. चिंचबंदर परिसरात राहणारी नसरीन शेख (२५) ही तरुणी औषधी गोळया विकत असल्याचे पथकाच्या स्पष्ट झाले. त्यानंतर प्रभारी पोलीस निरीक्षक संतोष भालेकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सापळा रचून नसरीनला ताब्यात घेतले. तिच्या घरी छापा घालून शोधाशोध केली असता अल्को, एक्सल-पॅम, नायट्राझेपाम या नावे विक्रीस उपलब्ध असलेल्या अल्प्राझोलमची तब्बल आठ



हजार पाकिटे सापडली. याशिवाय कोरेक्स कफ सीरपच्या ६५ बाटल्या आढळल्या. नसरीनच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे रेश्मा खान या महिलेलाही अटक करण्यात आली. तिच्या घरातून कफ सीरपच्या दीडशे बाटल्या जप्त करण्यात आल्या. अल्प्राझोलम गोळयांचे एक पाकीट (दहा गोळयांचे) २७ रुपयांना औषध दुकानातून विकले जाते. नसरीन, रेश्मा हे पाकीट १०० ते १५० रुपयांना विकत. कफ सीरपची विक्रीही चढ्या भावानेच केली जात असे. कोकेन, एमडी, चरस विकत घेणे शक्य नसलेला वर्ग औषधांद्वारे नशा करतो, असे निरीक्षण अमली पदार्थ विरोधी पथकाकडून नोंदवण्यात आले. यात शाळा, महाविद्यालयातील तरुण आघाडीवर आहेत. अमली पदार्थ असलेल्या मॅण्ड्रेक्सच्या गोळयांना 'बटण' असे संबोधले जाते. सध्या अल्प्राझोलमच्या गोळयांचाही 'बटण' म्हणूनच उल्लेख होतो.

# कल्याणमध्ये गतिमंद तरुणीवर बलात्कार



**डोंबिवली** - घरात एकटी असल्याचा फायदा घेत एका नराधमाने गतिमंद तरूणीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली. कल्याण पूर्व भागात घडलेल्या या घटनेत मुलीला मारहाण केल्याचाही प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी गणेश गोसावी नावाच्या नराधमाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पीडित २० वर्षीय गतिमंद मुलगी आपल्या कुटुंबासह कल्याण पूर्व परिसरात राहते. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास या तरूणीचे आई-वडील व आजी कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यामुळे घरात ती एकटी होती. घरात एकटी असल्याची संधी साधत त्याच परिसरात राहणारा गणेश गोसावी याने तिला जबरदस्तीने आपल्या घरात नेले. या ठिकाणी मारहाण करत तिच्यावर बलात्कार केला. हा प्रकार घरी परतलेल्या आई-वडिलांना पीडित तरूणीने सांगितला. या प्रकरणी पीडित तरुणीच्या आईने कोळसेवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी गणेश गोसावी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# दक्षिण मुंबईत खासगी बसगाड्यांवर बंदी

**मुंबई** - दक्षिण मुंबई परिसरात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांच्या कामांमुळे इथल्या वाहतूक व्यवस्थेवर येणारा ताण हलका करण्याकरिता अवजड वाहनांबरोबरच खासगी बसगाड्यांच्या चलनवलनावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यामुळे भायखळा, वरळीच्या पुढे दक्षिण मुंबईत जड वाहने आणण्याकरिता चालकांना वेळा पाळाव्या लागतील. तसेच, जड वाहनांवरील निर्बधांचीही यापुढे वाहतूक पोलिसांकडून काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल.

दक्षिण मुंबईत सकाळी आठ ते सकाळी अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊपर्यंत मुंबईत प्रवेश करण्यास आणि मुंबईतून जाण्यास



खासगी प्रवासी बसगाड्यांना परवानगी नसेल. त्यामुळे खासगी प्रवासी बसने दक्षिण मुंबईत येणाऱ्यांचे हाल होणार आहेत. तसेच जड वाहनांवरील बंदी आधीप्रमाणे कायम राहणार आहे. हे निर्बंध तात्काळ लागू करण्यात येत असल्याची माहिती मुंबई वाहतूक पोलिसांनी दिली. जड वाहनांवरील निर्बंधांमधून अत्यावश्यक सेवा देणारी भाजीपाला, दूध, ब्रेड, बेकरी उत्पादने, पाण्याचे टँकर्स, पेट्रोल, डिझेल, रुग्णवाहिका यांना वगळण्यात आले आहे. शालेय बसगाड्यांनाही हे निर्बंध लागू नसतील. वाहनतळाच्या बाबतीतही काही निबधांचे पालन करावे लागेल. स्वत:च्या अथवा भाड्याने घेतलेल्या जागेत तसेच अधिकृत पे अँड पार्कच्या जागेतच खासगी प्रवासी बस आणि अन्य अवजड वाहने उभी करता येतील. मुंबईत इतर सर्व रस्त्यांवर वाहने उभी करता येणार नाहीत. तसेच, रस्त्यालगतच्या पाणी भरण्याच्या ठिकाणी एकावेळी फक्त दोन टँकर्सना उभे राहण्याकरिता जागा देण्यात येईल, असे मुंबई वाहतूक पोलिसांनी सांगितले.

# म्हाडाच्या घरांतील घुसखोरांवर प्रशासनाची करडी नजर!




**मुंबई - मध्यमवर्गीय आणि गरजूंना हक्काचे घर मिळावे यासाठी १९९६ मध्ये म्हाडाने जागतिक बँकेच्या साहाय्याने गृहप्रकल्प राबविला. परंतु या गृहप्रकल्पात मूळ भूखंडधारकाऐवजी अन्यांचीच घुसखोरी म्हाडाला आढळून आली आहे. या घुसखोरीचा म्हाडाकडून लवकरच आढावा घेतला जाणार आहे. सुरुवातीला ५० हजारहून अधिक लाभार्थीपैकी अनिवासी वापर करणाऱ्यांची तपासणी सुरू होणार आहे. त्यानंतर या घुसखोरांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.**

कांदिवली-चारकोप, बोरिवली-गोराई, अंधेरी-वर्सोवा, मालाड-मालवणी, मुलुंड आदीसह ठाण्यातील माजिवडे, पाचपाखाडी येथे तब्बल एक हजार ५५ एकर इतक्या मोकळ्या भूखंडावर म्हाडाने जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने गृहप्रकल्प राबविले. अत्यल्प व अल्प गटातील तब्बल ५० हजार रहिवाशांना माफक दरात सोडतीने भूखंड उपलब्ध करून दिले. या भूखंडावर घरे बांधण्यासाठी जागतिक बँकेने अर्थसाहाय्य केले. या भूखंडावरील रहिवाशांनी एकत्र येऊन गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या. त्यानंतर बैठी घरे उभारली. परंतु यापैकी आता अनेक घरांची विक्री करण्यात आली असून या घरांचा व्यावसायिक वापर केला जात आहे. जागतिक बँकेसोबत झालेल्या लीज कराराचा तो भंग असल्याचे आढळून आले आहे. या करारनाम्यानुसार ज्या भूखंडधारकाला वितरण झाले आहे त्यानेच तेथे वास्तव्य करणे बंधनकारक आहे. त्यात कुठलाही बदल करावयाचा असल्यास तो अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. परंतु एकाही प्रकरणात मुख्य अधिकाऱ्यांची मंजुरी घेण्यात आली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ही घुसखोरी असल्याचे म्हाडाचे म्हणणे आहे.

# ४९ टक्के महिला म्हणतात, मारणे हा नवऱ्याचा हक्कच

**मुंबई - हिंसेचे समर्थन होऊ शकत नाही; मात्र राज्यातील ४९ टक्के महिलांना नवऱ्याने मारले तर फार वावगे वाटत नाही. नवरा आहे, मारणारच असाच त्यांचा दृष्टिकोन राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-४ मध्ये समोर आला आहे.**

सासूला मान दिला नाही (३७ टक्के), मुलांकडे तसेच घरातल्या कामांकडे लक्ष देत नाही (१७ टक्के), वाद घालते किंवा स्वतःची मते हिरिरीने मांडते (१६ टक्के), एकनिष्ठतेबद्दल शंका (२४ टक्के) अशा विविध कारणांस्तव स्त्रियांना मार खावा लागतो, असे सर्वेक्षणात समोर आले आहे. लैंगिक तसेच शारीरिक संबध हे पती-पत्नीमधील हिंसेचे प्रमुख कारण असल्याचेही यात अधोरेखित होते.

८२ टक्के स्त्रियांनी पती एकनिष्ठ नसेल वा त्याला लैंगिक संबंधातून संक्रमित झालेला संसर्गजन्य आजार असेल तर त्याच्याशी शरीरसंबध न ठेवण्याचा हक्क असल्याचे सांगितले. मात्र ७९ टक्के पुरुषांची हा नकार पचवण्याची तयारी नसते. पतीसोबत शारीरिक संबंधास नकार देणाऱ्या स्त्रियांना शारीरिक त्रास, आर्थिक कोंडी, जबरदस्ती करणे वा दुसऱ्या स्त्रीसोबत शारीरिक संबध ठेवणे हा पुरुषांचा अधिकार आहे, असे



मत व्यक्त केले.

राज्यातील २१ टक्के महिला कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या हिंसेच्या शिकार आहेत. वयाच्या १५व्या वर्षापासून त्यांनी शारीरिक हिंसा सहन केली आहे. त्यातील महिलांवर झालेले सर्वाधिक अत्याचार पतीने केलेले आहेत. गरोदरपणातही तीन टक्के महिलांना मारहाण सहन करावी लागली आहे. अशिक्षित, घटस्फोटित, पाचहून अधिक मुले असलेल्या, एकल महिलांनी अन्य गटांतील महिलांपेक्षा घरगुती व सार्वजनिक पातळ्यांवर हिंसेचा अधिक सामना केला असल्याचे सर्वेक्षण सांगते. २१ टक्के विवाहित महिलांनी कानाखाली मारणे, हात ओढणे, ढकलून देणे, लैंगिक संबंध न ठेवल्यामुळे मारझोड करणे, एखादी वस्तू फेकून मारणे, तोंड दाबून ठेवणे, चटका देण्यासारखे प्रकार केले जातात व ते मुकाट्याने सहन करावे लागतात अशी विदारक स्थिती या सर्वेक्षणादरम्यान नमूद केली.

***मदतीकडे पाठ***

दारूचे व्यसन असलेल्या नवऱ्याचे मारहाणीचे प्रमाण व्यसन नसणाऱ्यांपेक्षा अधिक आहे. या सर्वेक्षणात १५ टक्के स्त्रियांचे पती न पिणारे आहेत, मात्र जुनाट विचारांमुळे पत्नीने कसे वागावे याची चौकट त्यांनी ठरवलेली आहे. त्यामुळे त्यांच्या धाकात न राहणाऱ्या पत्नीला मारहाण करताना ते मागेपुढे पाहत नाही. वेगवेगळ्या सामाजिक संस्था तसेच व्यक्तींच्या माध्यमातून स्त्रियांना हिंसामुक्त वातावरणामध्ये ठेवण्यास मदत उपलब्ध आहे; मात्र हिंसेच्या शिकार होणाऱ्या अवघ्या तीन टक्के महिलांनी ही मदत घेतली आहे.

# आता व्याजदरांत कपात शक्य!

**मुंबई** - नव्या आर्थिक वर्षात सामान्यांसह मध्यमवर्गीयांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून दिलासा मिळण्याची दाट शक्यता आहे. महागाईचा धोका संपुष्टात आल्याने आरबीआयकडून एप्रिलच्या पतधोरणात रेपोदरात पाव टक्क्यांनी कपात होण्याची चिन्हे असून, बँकांकडून व्याजदर कपात होण्याची शक्यता आहे.

अमेरिकास्थित मेरिल लिंच या वित्तीय संस्थेने भारतातील महागाई आणि व्याजदराबाबत प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे की, भारतात गेल्या डिसेंबरअखेरपर्यंत ५.२ टक्क्यांपर्यंत महागाईचा दर पोहोचला होता. आता महागाईचा दर नियंत्रणात आला आहे. त्यामुळे निश्चितच आरबीआयकडून कर्जदारांना दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. नव्या आर्थिक वर्षातील पहिल्या पतधोरण



आढाव्यातच आरबीआयकडून रेपोदरात ०.२५ टक्के घट होण्याची शक्यता आहे. फेब्रुवारीत आरबीआयची पतधोरण समिती यासंदर्भात आढावा घेईल. मान्सूनच्या आगमनास 'अल् निनो'चा धोका नसल्याने अन्नधान्याच्या किमतीही जूनपर्यंत आटोक्यात राहणार आहेत. पेट्रोल, डिझेलचे दर वाढत असले तरी कच्च्या तेलाचे भावही या वर्ष अखेरीपर्यंत प्रतिबॅरल ६२ डॉलर्सपर्यंत खाली येण्याची चिन्हे आहेत. या सर्व बाबींचा पतधोरण समिती आढावा घेऊन व्याजदर कपातीबाबत आरबीआयला शिफारस करेल, असे या अहवालात म्हटले आहे.

# राधाकृष्ण विखे पाटील यांच्या घरी हेरगिरी?



**मुंबई:** आपल्या निवासस्थानी पोलिसांनी हेरगिरी केल्याचा खळबळजनक आरोप विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला आहे. याबाबत त्यांनी राज्यपालांकडे थेट लेखी तक्रारच केली आहे. घडलेल्या प्रकाराबाबत गृहखात्याविरुद्ध चौकशी करून कारवाईचे निर्देश द्यावेत अशी मागणीच विखे पाटील यांनी पत्राद्वारे राज्यपालांकडे केली आहे.

विखे पाटील यांच्या निवासस्थानी गेल्या गुरुवारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेचे कर्मचारी अनधिकृतपणे माहिती घेत असल्याचे दिसून आल्याचे विखे पाटील यांनी म्हटले आहे. याबरोबरच, पोलिस कर्मचारी पत्रकारांची छायाचित्रेही काढली असल्याचे विखे पाटील यांचे म्हणणे आहे.

हा प्रकार अत्यंत गंभीर आणि लोकशाहीला काळीमा फासणारा असल्याचे विखे पाटील यांनी पत्रात म्हटले आहे. पोलिसांनी विधानसभा विरोधी पक्षनेत्याच्या शासकीय निवासस्थानी विनाअनुमती प्रवेश करणे, पत्रकारांची छायाचित्रे काढणे, हा प्रकार अत्यंत संतापजनक, निषेधार्ह आणि घटनात्मक पद असलेल्या विरोधी पक्षनेत्यांच्या मुलभूत हक्कांचा भंग आहे असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.

# आसनगाव ठरणार मध्य रेल्वे मार्गावरचे पहिले 'ग्रीन' स्टेशन


**मुंबई** - मध्य रेल्वेवरील आसनगाव हे स्टेशन पहिले ग्रीन स्टेशन ठरणार आहे. मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार ४ फेब्रुवारीला आसनगाव हे ग्रीन स्टेशन झाल्याची घोषणा करण्यात येईल असा अंदाज आहे. या स्टेशनवरचे लाईट, ट्युबलाईट, तिकिटांसाठीचे मशीन, पंखे हे सगळे काही सौर उर्जेवर चालू शकणार आहे. म्हणूनच हे स्टेशन ग्रीन स्टेशन ठरणार आहे. दररोज सुमारे ७५ हजारांपेक्षा जास्त प्रवासी या स्टेशनवरून प्रवास करतात. सध्या या स्टेशनला ११ किलोवॅट वीजेची गरज भासते. रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या स्टेशनसाठी १० किलोवॅट क्षमतेचा सोलार प्लांट आणि सहा किलोवॅटचा विंड एनर्जी प्लांट आसनगाव स्टेशनवर लावण्याचे काम सुरु आहे. 'हिंदुस्थान टाइम्स'ने या संदर्भातले वृत्त दिले आहे.




मध्य रेल्वे मार्गावर ग्रीन स्टेशनचा दर्जा मिळणारे आसनगाव हे पहिले स्टेशन ठरणार आहे अशी माहिती रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक एस. के. जैन यांनी दिली. सौर उर्जेमुळे वीज बिलात कमालीची कपात होणे शक्य होणार आहे. तसेच आसनगावप्रमाणेच आणखी ५० स्टेशन्सवर नेहेमीच्या दिव्यांची जागा एलईडी दिवे घेणार आहेत. या दिव्यांमुळे वर्षभरात वीज बिलात १ कोटी ४८ लाखांची बचत होणे शक्य होणार आहे असेही रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# एमआरआय मशीनमध्ये थरकाप उडवणारा मृत्यू

- **मुंबईतील रुग्णालयात घडली धक्कादायक घटना**
- **रुग्णालय प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचा आणखी एक बळी**



**मुंबई - मुंबईच्या नायर रुग्णालयात एक थरकाप उडवणारी घटना घडली असून यामध्ये एका व्यक्तीचा एमआरआय मशीनमध्ये विचित्रप्रकारे मृत्यू झाला आहे. ही मशीन इलेक्ट्रोमॅग्नेटिक असल्याने या व्यक्तीजवळ असलेल्या ऑक्सिजन सिलेंडरला मशीनने आपल्याकडे आकर्षित केल्याने त्यातील गॅस बाहेर पडून तो त्या व्यक्तीच्या पोटात पसरला. त्यानंतर रुग्णाचे पोट फुगू लागले आणि अक्षरशः त्याचे डोळे बाहेर आले. त्यानंतर त्याला ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले मात्र तेथे उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही दुर्घटना केवळ रुग्णालय प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे घडल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी नायर रुग्णालय प्रशासनाविरोधात भादंवि कलम ३०४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

राजेश मारू (वय ३२) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. राजेशचे मेव्हणे हरीश सोलंकी यांनी सांगितले की, त्याच्या आईची प्रकृती ठीक नव्हती. यासाठी त्यांना नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांना आपल्या आईचा एमआयआर करण्यास सांगितले. त्यांच्याबरोबर राजेशही रुमपर्यंत जाणार होता.

एमआयआर रुमच्या बाहेर वॉर्डबॉयने राजेशच्या गळ्यातील सोन्याची साखळी आणि घड्याळ सुरक्षेसाठी काढून घेतले होते. मात्र, रुग्णासाठी जवळ असलेला ऑक्सिजन सिलेंडर त्याला आत घेऊन जाण्यास सांगण्यात आले. सुरुवातीला त्याने विरोध केला मात्र, वॉर्डबॉयने सांगितले की एमआरआय मशीन बंद असून अद्याप सुरु करण्यात आलेले नाही. त्यानंतर राजेश रुममध्ये गेला आणि एमआरआय मशिनने तत्काळ सिलेंडरला आपल्याकडे खेचून घेतले. सिलेंडरला पकडून राजेशही या मशिनमध्ये अडकला गेला. त्याचवेळी उच्च दाबामुळे त्या सिलेंडरचे झाकण उघडले गेले आणि त्यातील संपूर्ण वायू हा राजेशच्या पोटात गेला. हरीशने सांगितले की, वॉर्डबॉयच्या मदतीने त्यांनी राजेशला बाहेर ओढण्याचा प्रयत्न केला. त्याला बाहेरही काढण्यात आले आणि ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले मात्र, उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## संपादकीय... महागाईच्या वणव्याकडे



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

पेट्रोल आणि डिझेलच्या दररोज वाढत चाललेल्या दरांनी आतापर्यतचा उच्चांक गाठल्यानंतर त्याच्या संभाव्य परिणामांची चर्चा सुरू झाली आहे. देशातील पेट्रोल आणि डिझेलचे भाव केवळ आर्थिक कक्षेपुरते मर्यादित नसतात, तर त्याचे राजकीय परिणामही असतात. तसेच, या दरांबाबत कायम संशयाची भावना आहे आणि त्यामागे काही अदृश्य मानवी हात कार्यरत असतात, असाही संशय असतो. आपण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या पुरवठा आणि मागणी यानुसार बदलत जाणाऱ्या दरांशी बांधले गेलो असल्याने त्यात होणाऱ्या हेलकाव्यानुसार इथले दरही फरफटत राहतात. काही महिन्यांपूर्वी यात पारदर्शकता आणण्यासाठी गतिमान दरनिश्चिती धोरण राबविले गेले. त्यानुसार इंधन दर पेट्रोलियम पंपांवर दररोज सकाळी सहा वाजता निश्चित केले जातात. त्यात जसे दर बदलतील तसे ग्राहकांच्या खिशातून निघणाऱ्या रकमाही ठरतील, हा त्यामागचा हेतू. तथापि, त्यात बहुतांश वेळा दर वाढतच गेल्याचे दिसते. आणि या परिस्थितीपुढे ग्राहक हताशपणे नेहमीच्या ठरलेल्याच रकमेत टाकीत कमी कमी टाकले जात असलेले इंधन पाहात गप्प राहिला आहे. मंगळवारी दिवसाअखेर या दरांनी आतापर्यतचे सगळे विक्रम तोडले. मुंबईत प्रतिलिटर पेट्रोल ८०.१० रुपये तर डिझेल ६७.१० रुपये किमतीला विकले गेले. त्याचा मानसिक धक्का ग्राहकांना बसणे साहजिक आहे. देशभरातही पेट्रोलचा दर एक ते दोन टक्के तर डिझेलचा दर दोन टक्क्यांनी वधारला आहे. जगाच्या बाजारात तेलपिंप ६९ डॉलरजवळ पोहोचले आहे. सहा महिन्यांपूर्वी म्हणजे जून २०१७ मध्ये कच्च्या तेलाचे सरासरी भाव प्रतिपिंप सुमारे ४६ डॉलर होते. या काळात पेट्रोलदरात ३.३१ रुपये तर डिझेलदरात प्रतिलिटर ४.८६ रुपयांची वाढ झाली. जगात ज्या वेगाने दर वाढत आहेत त्या वेगात ते थेट ग्राहकांना लागू न होण्यासाठी अदृश्य हात त्यातील वाढ सूक्ष्म प्रमाणात कमी करत असावेत. जागतिक बाजारपेठेतील किंमत स्थानिक ग्राहकांकडून वसूल करणे अवघड असल्याने रोजच्या छोट्या छोट्या मात्रेने जाणवणार नाहीत, अशा पद्धतीने ते वाढविले जात असावेत. या दरवाढीचे आर्थिक दुष्परिणाम अर्थातच महागाईच्या स्वरूपात आणि राजकीय तापमानवाढीतून जाणवतात. विशेषत:, डिझेल दरातली वाढ आणि पेट्रोल दरांच्या तुलनेत दोन्ही भावांमधला सतत कमी होणारा फरक हा चिंतेचा विषय आहे. प्रामुख्याने मालवाहतूक आणि विशेषत: खाद्यपदार्थांच्या वाहतुकीत डिझेलच्या गाड्या असल्याने महागाईचा पहिला फटका सर्वसामान्यांना बसतो. त्यासाठी त्याच्याकडे कोणतेही वाहन असण्याची गरज नाही. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले तेव्हा कच्च्या तेलाच्या किमती १०७ डॉलर प्रतिबॅरल होत्या. तेव्हाही बाजारातील किमती अशाच वधारल्या होत्या. या इंधनदरवाढीतून निर्माण झालेल्या महागाईच्या झळांचे रूपांतर मतांमध्ये करण्यात भारतीय जनता पार्टीने तेव्हा यश मिळविले. तो प्रमुख मुद्दा बनला. एनडीए सरकार आल्यानंतर काही महिन्यांतच जगाच्या बाजारात क्रूड ऑईलचे दर झपाझप कोसळू लागले. वर्ष-दीड वर्षाच्या कालावधीत हे दर प्रतिपिंप २७ डॉलर इतके घसरले. मात्र, या काळात या घसरणीचा ग्राहकांना फायदा मिळाला नाही. कारण, सरकारने पेट्रोल, डिझेलवर लागू असलेल्या करांमध्ये जबर वाढ केली. त्यामुळे विविध कारणांमुळे जगभर पडलेल्या दरांचा ग्राहकांना कोणताही फायदा झाला नाही. ग्राहकांच्या नाराजीचे कारण नेमके तेच आहे. तेव्हा तो लाभ मिळाला असता तर आताची नाराजी इतकी तीव्र बनली नसती. या नाराजीचे रूपांतर आपल्या विरोधातील रोषात होऊ नये, याची काळजी सरकारला वाटणार, यात शंका नाही. मात्र, त्यासाठी हे भाव खाली आणावे लागतील. निदान ते अजून वाढू न देण्यासाठी उपाय शोधावे लागतील. त्यासाठी अर्थातच पाऊल पुढे टाकले गेले आहे, असे दिसते. कारण पेट्रोलियम खात्याने अर्थ खात्याकडे इंधनांवरील उत्पादन शुल्क घटवण्याची मागणी केलीच आहे. अर्थसंकल्प तोंडावर असताना अर्थमंत्री अरुण जेटली ही मागणी मान्य करण्याची शक्यता आहेच. मात्र त्यात वित्तीय तूट वाढण्याचा धोका असल्याने ती कसरत कशी करायची हा सर्वात मोठा प्रश्न सरकारपुढे असेल. सामान्य ग्राहकांसमोर मात्र आज सरकार काहीतरी मार्ग काढेल, अशी आशा बाळगण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय नाही.



# पन्नाशीतले प्रौढत्व




**आगामी निवडणुका स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतल्याबद्दल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे अभिनंदन. हे असे स्वबळावर लढणे केव्हाही चांगलेच. स्वबळावर लढताना आपणास नक्की कोणाबरोबर लढावयाचे आहे हे नक्की करावे लागते. गेले काही महिने शिवसेना आणि भाजप यांच्या संसाराची लक्तरे ज्या प्रमाणात रोजच्या रोज चव्हाट्यावर येत आहेत हे पाहता सेनेने कोणाशी लढावयाचे ते नक्की केलेले दिसते. स्वबळावर लढण्याचे आणखी एक कारण म्हणजे या निमित्ताने आपले नक्की बळ तरी किती हे कळते. वास्तविक गेल्या विधानसभा निवडणुका शिवसेनेने स्वबळावरच लढवलेल्या होत्या. तीत ६३ आमदारांवर मजल मारली. परंतु त्या वेळची परिस्थिती वेगळी होती आणि मतदार नरेंद्र मोदी लाटेतून बाहेर आला नव्हता. आगामी निवडणुकांत त्या लाटेची निर्मिती नव्याने करता आली नाही तर सेनेच्या संख्येत निश्चितच वाढ होऊ शकते. स्वतंत्र लढण्यामागील अन्य वेगळे एक कारण म्हणजे अशा लढण्यातून ज्याप्रमाणे आपल्याच ताकदीचा आपल्याला अंदाज येऊ शकतो त्याचप्रमाणे आपल्या ताकदीचे दर्शन विरोधक वा स्पर्धकांनाही घडवता येते. तथापि जवळपास तीन दशकांच्या संसारानंतर आपली ताकद किती हे जोडीदारास दाखवून देण्याची गरज शिवसेनेस वाटली यातच या एकत्र नांदण्यातील फोलपणा दिसून येतो.**

यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे या संसाराची निर्थकता दाखवून देण्यासाठी सेनेने साधलेला मुहूत. देशात सध्या आगामी निवडणुकांची वातावरणनिर्मिती सुरू आहे आणि २०१९ सालातील लोकसभा निवडणुकांच्या बरोबरच विधानसभा निवडणुकांचाही बार उडवून द्यावा असा भाजपचा प्रयत्न आहे. थोरलीच्या लग्नानिमित्ताने सगळे जमणार असताना त्याच खर्चात धाकटीचेही उरकून टाकावे तसेच हे. फारसा विचार न करण्याच्या आजच्या काळात बहुसंख्यांना हा निर्णय स्वागतार्ह आणि खर्च वगैरे वाचवणारा वाटू शकेल. परंतु थोरलीच्या लग्नात धाकटीचेही उरकण्याच्या प्रयत्नात जसे धाकटीच्या गरजा, योग्य तो जोडीदार निवडण्याच्या तिच्या अधिकाराची पायमल्ली वगैरे बऱ्याचदा होते तसेच या निर्णयानेही होणार आहे. त्या विषयी सविस्तर नंतर. परंतु त्या निर्णयाची चाहूल लागल्यामुळेच शिवसेनेने आपला इतक्या वर्षांचा जोडीदार असलेल्या भाजपस खिंडीत पकडण्याचा निर्णय घेतला यात तिळमात्रही शंकेस जागा नाही. या मागचे साधे कारण असे की आगामी लोकसभा निवडणुकांत महाराष्ट्र राज्य हे निर्णायक भूमिका बजावेल.


उत्तर प्रदेशातील ८० पैकी ७२ खासदार आताच भाजपचे आहेत. हा विक्रमी विजय. परंतु विक्रम काही वारंवार होत नाही. तेव्हा या सर्वच्या सर्व जागा आपल्याच हाती राहतील असे भाजपलादेखील वाटत नाही. याचा अर्थ इतक्या एकगठ्ठा जागा मिळवून देणाऱ्या दुसऱ्या राज्याची भाजपस गरज लागेल. हे दुसरे क्रमांकाचे राज्य म्हणजे महाराष्ट्र. अठ्ठेचाळीस खासदार निवडून देणारे महाराष्ट्र हे उत्तर प्रदेशच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचे राज्य. अन्य मोठी राज्ये म्हणजे बिहार, तमिळनाडू आणि प. बंगाल. या तीनही राज्यांत भाजपचे असे स्वतंत्र स्थान नाही. बिहारात त्यांना नितीशकुमार यांच्यावर अवलंबून राहावे लागणार आहे, तमिळनाडूत कोणावर विसंबून राहायचे ते नक्की व्हावयाचे आहे आणि प. बंगालचे तूर्त तरी काहीच करता येत नाही अशी स्थिती. तेव्हा भाजपस सर्वात जास्त भिस्त ठेवावी लागणार आहे ती महाराष्ट्रावर. या राज्याने जास्तीत जास्त खासदार निवडून दिले तर २०१९ नंतर पुन्हा एकदा सत्ताधारी होण्याचे भाजपचे स्वप्न साकार होईल. तेव्हा या स्वप्नाचा फुगा फोडणे हे शिवसेनेचे लक्ष्य आहे हे लक्षात घ्यावे लागेल. तसेच सध्या जी लक्षणे दिसतात त्याप्रमाणे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यात युती झाली तर महाराष्ट्रात भाजपला दोन आघाड्यांवर लढावे लागेल. सेनेचा प्रयत्न हाच आहे. कारण खिंडीत सापडल्याखेरीज भाजप समोर दिंडीत चर्चा करावयास येत नाही, हा सेनेचा अनुभव. त्यामुळेच अडचणीत आलेल्या भाजपच्या अडचणींत वाढ व्हावी याच हेतूने सेनेस हा निर्णय जाहीर करणे भाग पडले. परंतु तीन तीन दशके संसार झाल्यानंतरही आपल्या जोडीदाराविषयी सेनेच्या मनात इतकी कटुता का, हा खरा प्रश्न आहे. त्याचे उत्तर भाजपच्या वर्तनात आढळते. मुळात सेनेशी केलेला संग हा सोयसंबंधांचा भाग आहे हे भाजपने कधीच लपवले नाही. शिवसेनाप्रमुख हयात असतानाच भाजपने 'शत प्रतिशत भाजप' ही घोषणा देऊन आपला इरादा स्पष्ट केला होता. म्हणजे विवाह नोंदणीप्रसंगीच घटस्फोटाचा अर्जही घेऊन ठेवावा अशी भाजपची कृती होती. तरीही या दोन्हींचा संग इतका काळ टिकला तो केवळ बाळासाहेब ठाकरे आणि भाजपचे वाजपेयी/ अडवाणी यांच्यातील सौहार्दतेमुळे. राजकीय क्षितिजावरून हे दोघे दूर झाल्यानंतरचा भाजप हा रोकडा व्यवहार करणारा पक्ष आहे. 'माझे ते माझे आणि तुझे तेही माझेच', असे त्याचे राजकारण आहे. जे आपल्या समवेत नाहीत ते आपले शत्रूच अशी त्या पक्षनेतृत्वाची वर्तणूक आहे. कर्नाटक, तमिळनाडू, बिहार आदी राज्यांतील अनेक उदाहरणांतून तेच दिसून येते. शंभर टक्के शरणागतीखेरीज अन्य काहीही भाजप नेतृत्वास चालत नाही. ही शरणागती जे पत्करतात ते नितीशकुमार यांच्यासारखे सत्ता राखू शकतात. परंतु सत्ताही राखावयाची आणि मानही ताठ ठेवायची हे भाजपस मंजूर नाही. आणि पंचाईत अशी की इतकी मान खाली घालून गुमान जे ताटात पडेल ते गोड मानून घ्यायचे की मान वर करून अधिक काही मागावयाचे याचा निर्णय घेणे शिवसेनेस शक्य झाले नव्हते. गुजरात विधानसभेच्या निकालाने सेनेस हे मान वर करावयाचे धर्य प्राप्त झाले असणार. आता त्या पक्षाचे लक्ष असेल ते कर्नाटक आणि त्यानंतर मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यांतील निवडणुकांवर. शक्यता अशी की यातील कर्नाटक हा भाजपसाठी गुजरातपेक्षा अवघड ठरेल. तसे झाल्यास सेनेची मान अधिकच ताठ होईल आणि भाजपला सेनेची अधिक गरज लागेल. तेव्हा आपली किंमत वाढवून घेण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणूनदेखील सेनेच्या या निर्णयाकडे पाहावे लागेल. तसे केले तरीही एक मुद्दा उरतो.

तो म्हणजे अराजकीय शत्रूंशी लढण्याची सेनेची तयारी किती आहे, हा. राजकीय लढाई ही तुलनेने सोपी असते आणि तिचा निकाल हा मतपेटीतून लागत असतो. परंतु अराजकीय लढाई ही केंद्राच्या हातातील गुप्तचर यंत्रणा, सक्तवसुली संचालनालय अशा तगड्या यंत्रणांशी लढावी लागते. अशा लढाईतील बचावाचे पहिले महत्त्वाचे साधन म्हणजे आपल्या सर्व निवासस्थानांतील कपाटांमधील सर्व रिकामे खण. ते तसे असले तर निश्चिंत मनाने दोन हात करता येतात. ज्या अर्थी भाजपशी असे दोन हात करण्याची तयारी उद्धव ठाकरे दाखवतात त्या अर्थी ते तसे असणार असे मानता येईल. परंतु स्वतंत्र लढण्याची घोषणा करून जर का नंतर ती ठाकरे यांना राखता आली नाही तर त्यामागची कारणे काय असतील याचा अंदाज बांधणे अवघड नाही. याकडे महाराष्ट्राचे आता लक्ष असेल. बाकी बठकीत आदित्य ठाकरे यांची अधिकृत नियुक्ती वगैरे सर्व काही सर्वच राजकीय पक्षांच्या कॉंग्रेसीकरणानुसारच झाले. या अधिवेशनातील नोंद घ्यावी अशी बाब म्हणजे निवडणुका स्वतंत्र लढवण्याचा सेनेचा निर्णय. पन्नाशीत का असेना आलेले हे प्रौढपण स्वागतार्हच.

# ठाण्यात कारवाईचा धडाका सुरूच

## अग्निसुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या हॉटेल, हुक्का पार्लरना टाळे, अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

***ठाणे - ठाण्यातील बहुचर्चित कोठारी कम्पाऊंड तसेच शहराच्या विविध भागांतील हॉटेल, लाऊंज बार आणि हुक्का पार्लरला अग्निशमन विभागाचा ना हरकत दाखला सादर करण्यासाठी महापालिकेने दिलेली पंधरा दिवसांची मुदत संपली असून या मुदतीनंतरही दाखले सादर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या हॉटेल, लाऊंज बार आणि हुक्का पार्लरला सील ठोकण्याची कारवाई महापालिकेने सोमवारपासून सुरू केली आहे. या कारवाईमध्ये कोठारी कम्पाऊंड तसेच शहरातील हॉटेल्सची बेकायदा बांधकामेही तोडण्यात आली.***



मुंबई येथील कमला मिल इमारतीमधील आगीच्या घटनेनंतर सर्वच शहरांमधील हॉटेल, लाऊंज बार आणि हुक्का पार्लरमधील अग्निसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या घटनेच्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका प्रशासनाने अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र नसलेल्या हॉटेल, लाऊंज बार आणि हुक्का पार्लरला नोटिसा बजावून कारवाईची तयारी केली होती. मात्र या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी संबंधित आस्थापनांच्या मालकांनी पालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांची भेट घेऊन काही दिवसांची मुदत मागितली होती. या मागणीनंतर आयुक्त जयस्वाल यांनी संबंधित आस्थापनांच्या मालकांना कागदपत्रे सादर करण्यासाठी पंधरा दिवसांची मुदत देऊ केली होती. ही मुदत शनिवारी संपल्याने आयुक्त जयस्वाल यांनी सोमवारपासून शहरात कारवाई सुरू केली आहे. त्यामध्ये पंधरा दिवसांच्या मुदतीनंतरही दाखले सादर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या हॉटेल, लाऊंज बार आणि हुक्का पार्लर अशा सहा आस्थापनांना सील ठोकण्यात आले, तर दहा हॉटेल्सचे बेकायदा बांधकाम कारवाईदरम्यान जमीनदोस्त करण्यात आले. या कारवाईसाठी आयुक्त जयस्वाल हे स्वत: रस्त्यावर उतरले होते. पोलीस बंदोबस्तात पालिकेच्या पथकाने ही कारवाई केली.

ठाणे महापालिकेच्या शनिवारी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये कोठारी कम्पाऊंडमधील बेकायदा बांधकामाच्या कारवाईसाठी आक्रमक झालेल्या भाजपच्या काही नगरसेवकांनी प्रशासनाच्या कारभारावर टीका केली होती. या टीकेनंतर महापालिकेने सोमवारपासून अग्निशमन ना हरकत दाखला नसलेली तसेच बेकायदा बांधकामे करण्यात आलेल्या शहरातील हॉटेल्ससह कोठारी कम्पाऊंडमधील बांधकामांवर कारवाई सुरू केली आहे.

# ओला, उबरचा एनएमएमटीला फटका

**नवी मुंबई - गेली अनेक वर्षे ४० कोटींपेक्षा जास्त वार्षिक तोटा सहन करणाऱ्या नवी मुंबई पालिकेच्या परिवहन उपक्रमाला आता ओला, उबर या खासगी प्रवासी सेवेचा फटका बसला आहे. त्यामुळे एनएमएमटीला १५ ते २० टक्के उत्पन्नावर पाणी सोडावे लागले आहे. तरीही मुंबई, ठाणे, पुण्यातील परिवहन उपक्रमांच्या तोट्यापेक्षा एनएमएमटीचा तोटा कमी करण्यात उपक्रमाला यश आले आहे. बेस्ट, टीएमटी, पीएमटी यांचा तोटा ४० कोटींपेक्षा जास्त आहे.**





२२ वर्षांपूर्वी २३ जानेवारीला नवी मुंबई पालिकेने २२ बस घेऊन स्वतंत्र परिवहन सेवा सुरू केली. त्यावेळी पालिकेत शिवसेनेची एकहाती सत्ता होती आणि त्याचे सुकाणू माजी मंत्री गणेश नाईक यांच्या हाती होते. त्यामुळे त्यांनी ही सार्वजनिक सेवा सुरू करण्यास प्राधान्य देत एनएमएमटीतील बसची संख्या टप्प्याटप्प्याने ४५० बसपर्यंत नेली. मंगळवारी या सेवेचा २२ वा वर्धापनदिन वाशी येथील भावे नाट्यगृहात साजरा करण्यात आला.

बंगळुरुतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वगळता कोणत्याही पालिकेची बससेवा यशस्वी झालेली नाही. तोट्यात चालणारी सेवा अशीच या सेवेची गणना केली जाते. नवी मुंबई पालिकेची एनएमएमटीही त्याला अपवाद नसून या सेवेला गेली अनेक वर्षे ४० ते ४२ कोटी रुपये वार्षिक तोटा होत आहे. तो कमी करण्यात आता प्रशासनाला यश आले आहे. तो आता ३८ कोटीवर आला आहे.

तीन वर्षांपासून सुरू झालेल्या ओला, उबर या खासगी कार वाहतूक सेवा चांगल्याच प्रभावी ठरल्या आहेत. काही मिनिटांत उपलब्ध होणाऱ्या या सेवेचा फटका बेस्टप्रमाणेच एनएमएमटीला बसला आहे. नवी मुंबईतून मुंबईत कामानिमित्त जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. त्यांच्यासाठी उपक्रमाने नरिमन पॉईंट, बोरिवली, अंधेरी, दादर मार्गावर वातानुकूलित बससेवा सुरू केली आहे. ओला, उबरची सेवा सुरू झाल्यापासून एनएमएमटीला १५ ते २० टक्के आर्थिक फटका (चार ते पाच लाख) बसला आहे.

# पोलिसांचे उद्यानात अतिक्रमण

**उल्हासनगर** - पोलिस ठाण्याच्या आवारात दिवसेंदिवस गुन्ह्यात जप्त केलेल्या वाहनांना जागा अपुरी पडत असल्याने गुन्हे शाखेने काही गुन्ह्यांमध्ये जप्त केलेल्या गाड्या पालिकेच्याच उद्यानात ठेवण्यास सुरुवात केली. त्यामुळे कॅम्प नंबर एक मधील बसस्टॉपच्या मागील उद्यानाला बकाल रूप आले त्याकडे नागरिकांनी पाठ फिरवली आहे. पोलिसांच्या या अतिक्रमणाविरोधात महापालिकेचे सभागृह नेते जमनादास पुरस्वानी यांनी पोलिस आयुक्तांकडे या प्रकरणी तक्रार करत उद्यानातील वाहने हटवण्याची मागणी केली आहे.

गुन्ह्यांमध्ये जप्त केलेल्या वाहनांचा सांभाळ करणे हा पोलिस विभागासाठी डोकेदुखीचा प्रश्न ठरत आहे. त्यात अनेक गुन्ह्यांचे प्रकरण न्यायालयातच प्रलंबित असल्याने नाइलाजास्तव ही वाहने पोलिस ठाण्याच्या आवारात वर्षनुवर्षे पडून असतात. त्यामुळे रोगराई पसरण्याचीही शक्यता असते. त्यात निकाली निघणाऱ्या वाहनांची संख्या कमी असून रोज घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये जप्त केलेल्या वाहनांची संख्या सर्वच पोलिस ठाण्यात वाढत आहे. उल्हासनगर येथील गुन्हे शाखेच्या बाबतीतही हाच प्रकार होत आहे. कॅम्प नंबर एक येथे असलेल्या गुन्हे शाखेच्या कार्यालयाची जागा गुन्ह्यातील जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी अपुरी पडत आहे. त्यामुळे गुन्हे शाखेने गुन्ह्यात जप्त केलेली वाहने कॅम्प नंबर एक येथील पालिकेच्या उद्यानात दोन वर्षांपासून ठेवण्यात येत आहेत. या उद्यानाची दुरवस्था झाली आहे. उद्यानात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता, घाणीचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी उद्यानाकडे पाठ फिरवली आहे.



याबाबत नागरिकांनी आरोग्याच्या समस्या उद्भवत असल्याने उल्हासनगर महापालिकेचे सभागृह नेता जमनु पुरस्वानी यांच्याकडे तक्रार केली. त्यांनी या प्रकरणी थेट पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांना यांच्याकडे तक्रार करत पालिकेच्या उद्यानातील गुन्हे शाखेची जप्त केलेली सर्व वाहने हटवण्याची मागणी केली. पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांनी या प्रकरणी अधिकाऱ्यांशी बोलून वाहने हटवण्याचे आश्वासन दिले असल्याचे पुरस्वानी यांनी सांगितले.

# अंबरनाथमध्ये गॅसच्या वाहिनीतून आगीचा भडका



**अंबरनाथ** - येथील पूर्व भागातील शिवगंगा नगर परिसरात सुरू असलेल्या एमजीपीच्या जलवाहिनीच्या खोदकामावेळी जमिनीखाली असलेल्या महानगरच्या गॅस वाहिनीला जेसीबीचा धक्का लागल्याने गळती होऊन आगीचा भडका उडाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. मात्र अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठी हानी टळली. मात्र या घटनेमुळे रिलायन्स गॅसवाहिनीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अंबरनाथ पश्चिम भागातील शिवगंगा नगर परिसरात वाढीव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलकुंभ उभारण्यात आला आहे. या जलकुंभातून टाकण्यात आलेल्या जलवाहिनीतून गळती होत असल्याची तक्रार आल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरू होते. मात्र यावेळी जेसीबीने खोदकाम सुरू असताना, त्यात भागात जमिनीखाली असलेल्या महानगरच्या घरगुती वापराच्या एलपीजी गॅसच्या वाहिनीला धक्का लागला. यामुळे वाहिनीमधून मोठा आगीचा भडका उडाला. ही आग साधारण १० फूटांहून अधिक उंच असल्याने या भागात एकच खळबळ उडाली होती. मात्र घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेऊन आग विझवली. यामध्ये कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र महावितरणकडून टाकण्यात आलेली गॅसवाहिनी पाच फूट जमिनीखाली अपेक्षित असताना, ती साडेतीन फूट खोल असल्याचे कळते.

# तलावपाळीला प्रेमवीरांचा वेढा!

## युगुलांकडून होणाऱ्या असभ्य वर्तनाने पादचाऱ्यांची मान खाली



**ठाणे** - ठाण्यातील शांत परिसर असलेल्या उपवन तलावाच्या काठावर बसणाऱ्या प्रेमीयुगुलांकडून होणाऱ्या असभ्य वर्तनाबद्दल तक्रारी येत असतानाच शहरातील मध्यवर्ती आणि गजबजलेल्या ठिकाणी असलेल्या मासुंदा तलावाच्या परिसरातही असेच प्रकार पाहायला मिळत आहेत. तलावपाळीच्या कठड्यावर बसून अश्लील चाळे करणाऱ्या तरुण-तरुणींमुळे या भागातून जाणाऱ्या पादचाऱ्यांना मान खाली घालून मार्गक्रमण करावे लागत आहे.

तलावपाळी हा परिसर ठाणेकर नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी जिव्हाळ्याचा आहे. मासुंदा तलावाकाठी असणाऱ्या पादचारी पुलावर चालण्यासाठी सकाळी आणि सायंकाळी नागरिक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. सुट्टीच्या दिवशी या ठिकाणी आबालवृद्धांची गर्दी असते. अशा वेळी तलावाच्या कठड्यावर बसून प्रेमीयुगुलांकडून असभ्य वर्तन होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. मध्यंतरी पोलिसांनी सायंकाळच्या वेळेस या भागात गस्त वाढवल्याने हा प्रकार कमी झाला. मात्र, आता सकाळी आणि दुपारी तलावपाळीवर अशा प्रेमीयुगुलांची गर्दी जमू लागली आहे. अनेकदा महाविद्यालयीन गणवेशातच तरुण-तरुणींचे अश्लील चाळे सुरू असतात. अशा परिस्थितीमुळे तलावपाळीलगतच्या पदपथावरून चालणेही नागरिकांना कठीण वाटू लागले आहे. लहान मुले सोबत असल्यास या परिसरातून चालणे चुकीचे वाटते, असे तलावपाळी परिसरात चालण्यासाठी येणाऱ्या मंगला सातपुते यांनी सांगितले.

# महाराष्ट्राचा चित्ररथ अव्वल!

## शिवरायांच्या राज्याभिषेक सोहळयाच्या चित्ररथाला प्रथम क्रमांक

**नवी दिल्ली - चित्ररथाच्या सुरुवातीला किल्ल्याची प्रतिकृती होती त्यावर मधोमध शिवरायांची अश्वारुढ प्रतिकृती दर्शवण्यात आली होती. तर मध्यभागी रायगडाची प्रतिकृती व त्या ठिकाणच्या मेघडंबरीत सिंहासनावर छत्रपती शिवराय विराजमान झालेले दाखविण्यात आले होते.**




प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीत आयोजित संचलनात महाराष्ट्राने सादर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या चित्ररथाला प्रथम क्रमांक मिळाला. प्रा. नरेंद्र विचारे यांची संकल्पना व कलादिग्दर्शक नितीन सरदेसाई यांनी साकारलेल्या या चित्ररथाने संचलनावेळी सर्वांची मने जिंकली होती. वर्ष २०१५ मध्ये महाराष्ट्राने सादर केलेल्या पंढरीची वारी या चित्ररथाला प्रथम क्रमांक मिळाला होता. आता दोन वर्षांनंतर महाराष्ट्राला पुन्हा एकदा हा सन्मान मिळाला. एकूण २३ चित्ररथ सादर करण्यात आले होते.

चित्ररथाच्या सुरुवातीला किल्ल्याची प्रतिकृती होती त्यावर मधोमध शिवरायांची अश्वारुढ प्रतिकृती दर्शवण्यात आली होत. तर मध्यभागी रायगडाची प्रतिकृती व त्या ठिकाणच्या मेघडंबरीत सिंहासनावर छत्रपती शिवराय विराजमान झालेले दाखवले होते. या ठिकाणी आभूषण देणारा दरबारी, त्याच्या शेजारी गागाभट्ट, तर या राज्याभिषेकासाठी उपस्थित असलेला इंग्रज अधिकारी सर हेन्री ऑक्सिजन दाखवण्यात आले होते. दरबारात छत्रपती शिवरायांच्या शेजारी बसलेल्या सोयराबाई आणि संभाजीराजे दाखवण्यात आले आहेत. चित्ररथाच्या मागच्या भागात आसनस्थ असलेल्या राजमाता जिजाऊ दर्शवण्यात आल्या होत्या.

प्रथम क्रमांक पटकावण्याची हॅटट्रिक करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. यापूर्वी १९९२ ते १९९५ अशी सलग तीन वर्षे महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला होता. तो चित्ररथ पाहून त्यावेळी तिथे उपस्थित असलेले राज्यसभा सदस्य छत्रपती संभाजी राजांनी शिवाजी महाराज की जय.. शिवाजी महाराज की जय.. हा जयजयकार केला होता. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्यांनीही त्यांना दाद देता महाराजांचा जयजयकार केला होता. राजपथावर १४ राज्यांसह केंद्र सरकारच्या ७ खात्यांचे आणि भारत-आशियान राष्ट्रांचे संबंध दाखवणारे २ चित्ररथ असे एकूण २३ चित्ररथ सादर करण्यात आले होते.

# प्रांजली पाटील देशातील पहिली दृष्टिहीन विद्यार्थिनी जिल्हाधिकारी

आज एका 'असामान्य जिद्दीचे हे आपल्या देशातील एकमेवाद्वितीय असे उधाहरण आहे जे आजच्या तरुण पिढीला मार्गदर्शन करून जिद्द निर्माण करणारे आहे. तसे पाहिले तर आज आपल्या देशाच्या ईतिहासत एक गौरवदिन आहे कारण आज गेल्या वर्षी यूपीएससीतच्या परीक्षात पहिली दृष्टिहीन विद्यार्थिनी सौ प्रांजली पाटील.हया उत्तीर्ण झाल्या आहेत .दृष्टिहीन असलेली प्रांजली लहेनसिंग पाटील (वय २८) ही परीक्षेत ७७३ गुणानुक्रमाने उत्तीर्ण झाली आहे. अंध विद्यार्थ्यांमधून पात्र ठरणारी ती पहिली महिला ठरली आहे.



समाजात अनेक ठिकाणी फिरताना असे चित्र दिसते की आज कुठे तरी या अंध आणि अपंग असे प्रतीभावत जे विद्यार्थी आहेत ते मागे राहतात ना रोजगार ना कायम स्वरूपी निवास पण आता काळ बदलत आहे. याचा सर्व पदवीधर विद्यार्थीनी आपल्या योग्य वयात उपयोग करून घ्यावा, जरूर मार्गदर्शन मिळेल.


मलकापूर तालुक्यातील वडजी हे प्रांजलीचे मूळ गाव. लहानपणापासून नजर कमकुवत असल्याने, शालेय जीवनातच प्रांजलीला अंधत्व आले. मात्र आई-वडिलांच्या प्रोत्साहनाने प्रांजलीने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. बी. ए. मध्ये विद्यापीठातून प्रथम येण्याचा मान तिने मिळविला. त्यानंतर स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी प्रांजलीने प्रयत्न सुरू केले.

आज तिच्या मेहनतीला यश आले आणि दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या (जेएनयू) निवड चाचणीत हजारो मुलांच्या निवडीतून प्रांजलीची निवड झाली. 'जेएनयू'तून तिने एमए. एम. फिल केले. याच विद्यापीठात सध्या 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयात ती पीएच.डी. करीत आहे. प्रांजलीने कोणताही खासगी क्लास न लावता केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविले आहे. भुसावळ तालुक्यातील ओझरखेडा हे तिचे सासर, सध्या ती पतीसमवेत उल्हासनगर येथे स्थायिक आहे.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठात राहूनच तिने स्पर्धा परीक्षेची तयारी केली. अभ्यासाशी नेहमी मैत्री केल्याने आजवरचा प्रवास आनंददायी ठरला आहे. दोन्ही डोळ्यांना अंधत्व असल्याने, अनेक अडचणींचा सामना करावा लागला. परंतु, आई-वडील आणि पतीच्या साथीने यश मिळाले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना कुठलेही दडपण न घेता पुस्तकांशी मैत्री करावी.

# जम्मू-काश्मीरमध्ये घातपाताचा कट रचणाऱ्या पुण्याच्या तरुणीला अटक

**जम्मू- काश्मीरमध्ये प्रजासत्ताक दिनी घातपाताचा कट रचणाऱ्या पुण्याच्या तरुणीला जम्मू- काश्मीरमधून अटक करण्यात आली. दक्षिण काश्मीरमधून तिला अटक करण्यात आली असून तिचा नेमका कोणत्या दहशतवादी संघटनेशी संबंध आहे, याचा तपास सुरु आहे.**



पुण्यातील येरवडा येथे राहणारी १८ वर्षांची तरुणी दोन वर्षांपूर्वी आयसिसच्या संपर्कात आली होती. मात्र, अल्पवयीन असल्याने पोलिसांनी त्या मुलीचे समुपदेशन करुन तिला सोडून दिले. सध्या ती काश्मीरमध्ये असून तिच्याकडून घातपात होण्याची शक्यता असल्याचा इशारा गुप्तचर यंत्रणांनी दिला होता. जम्मू-काश्मीर पोलिसांनी त्या तरुणीला दक्षिण काश्मीर येथून अटक केली. तिची कसून चौकशी सुरु असल्याचे समजते. ती आत्मघाती दहशतवादी होती, अशी देखील माहिती समोर येत आहे. मात्र, याबाबत जम्मू-काश्मीर पोलिसांनी अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही.

जम्मू-काश्मीरमधील पोलीस महानिरीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातून आलेली तरुणी खोऱ्यात बॉम्बस्फोट घडवण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये हा स्फोट घडवण्याचा तिचा प्रयत्न होता. ही माहिती मिळाल्यावर पोलिसांनी तिला अटक केली. या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीनगरमध्ये कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### तरुणीचे आयसिस कनेक्शन

उच्चभ्रु कुटुंबातील ही तरुणी बंडगार्डन रस्त्यावरील एका महाविद्यालयात शिकत होती. त्यावेळी सोशल मीडियातून ती आयसिस या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात आली होती. २०१५ मध्ये ही बाब तिच्या आई-वडिलांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी एटीएसशी संपर्क केला होता. ती सीरियात जाण्याच्या तयारीतही होती. पोलिसांनी केलेल्या समुपदेशनात ती सुधारल्याचे लक्षात आले. मात्र, जुलै २०१७ मध्ये जम्मू-काश्मीरला जाण्यासाठी निघाली. त्यावेळी तिला दिल्ली विमानतळावरुन ताब्यात घेण्यात आले. यानंतर समुपदेशनानंतर तिला पुन्हा कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले होते. आयसिससाठीच हल्ला घडवण्याचा तिचा प्रयत्न होता का, याचा तपास सुरु आहे.

# सोलापूर लवकरच उडान सेवेत

**मुंबई** - केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी उडान योजनेअंतर्गत लवकरच सोलापूर ते हैदराबाद व सोलापूर ते बेंगळुरूदरम्यान विमानसेवा सुरू केली जाणार आहे. स्पाइस जेट व एअर इंडियाशी करार केलेल्या अलायन्स एअर या कंपनीमार्फत ही सेवा सुरू होणार आहे. उडान योजनेच्या पहिल्या टप्प्यातच सोलापूर येथून हवाईसेवा सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली होती. मात्र काही अडचणींमुळे ही सेवा सुरू झाली नव्हती. सोलापूर विमानतळाजवळ असणाऱ्या एका उंच मनोऱ्यामुळे (चिमणी) उड्डाणात समस्या येत होती. या बांधकामाच्या मालकाशी नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी संपर्क साधून बांधकाम तोडण्यास सांगितले. लवकरच हे बांधकाम तोडले जाणार असून त्यामुळे या सेवेतील अडथळे दूर होणार आहेत.




स्पाइस जेटला सोलापूर ते बेंगळुरूदरम्यान सेवा देण्याचे कंत्राट मिळाले आह. भविष्यात ही सेवा लाभदायी ठरेल, असा कंपनीला विश्वास आहे. ही सेवा नेमकी कधी सुरू होईल, हे मात्र अजून ठरलेले नाही.

# 'विकासाच्या नावाखाली देशाचा विनाश सुरू'

**नागपूर - 'आज देशातील तरुण स्वेच्छेने विदेशात जातात, तेथे नोकरी करून आपले कर्तृत्व गाजवतात. परंतु, दहा वर्षानंतर ही परिस्थिती बदललेली असेल. देशातील भूजल पातळी घटते आहे. परिणामत: एकंदरीतच देशावरील जलसंकट खूपच भयंकर आहे. आपण योग्यवेळी योग्य ती पावले न उचलल्यास आणि सध्या विकासाच्या नावावर सुरू असलेला विनाश सुरूच ठेवल्यास परिस्थिती कठीण होईल. पुढील दहा वर्षानंतर देशातील नागरिकांना ऐच्छिक नाही तर सक्तीने आणि बेकायदेशीररीत्या स्थलांतरण करावे लागेल', अशी भीती देशातील प्रसिद्ध जलतज्ज्ञ आणि वॉटर मॅन म्हणून ओळखले जाणारे डॉ. राजेंद्र सिंह यांनी शनिवारी येथे व्यक्त केली.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र पदव्युत्तर विभागातर्फे धरमपेठेतील वनामती येथे आयोजित एका राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी डॉ. सिंह बोलत होते. विभागातर्फे 'भारतातील भूजल साठ्यांचे भविष्याच्या दृष्टिकोनातून व्यवस्थापन आणि नियमन' या विषयावर या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उद्घाटन समारंभाप्रसंगी मंचावर कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, भूगर्भशास्त्र पदव्युत्तर विभागाचे प्रा. ए. एम. पोफारे, डॉ. एम. एस. देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी राजेंद्र सिंह यांनी उपस्थितांना भविष्यात देशावर येणाऱ्या जलसंकटाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. तसेच भूगर्भशास्त्राचे तज्ज्ञ आणि विद्यार्थी या नात्याने यावर उपाय शोधण्याकरिता प्रेरित केले.



# 'गुड मॉर्निंग' ठरतेय तापदायक!

रोज व्हॉट्सअॅप ग्रुपवर पडणारे 'गुड मॉर्निंग', 'सुप्रभात' यांसारखे संदेश काहींना सुखावून जाणारे तर काहींना तापदायक ठरणारे! मात्र, अशा मेसेजच्या देवाणघेवाणीमुळे भारतीयांच्या स्मार्टफोनमधील मेमरी पूर्णपणे संपत असून, दर तीन स्मार्टफोनधारक भारतीयांपैकी एकाला या समस्येला सामोरे जावे लागत आहे. अमेरिकेत हे प्रमाण दर दहा स्मार्टफोनधारकांपैकी एक असे आहे.

'गुगल'ने या समस्येवर प्रकाश टाकला असून, वॉल स्ट्रीट जनरलने त्याविषयी सविस्तर वृतांत प्रसिद्ध केला आहे. लाखो भारतीय स्मार्टफोनधारक आपली 'ऑनलाइन' सुरूवात 'गुड मॉर्निंग' मेसेजनेच करतात. त्यासाठी लागणाऱ्या चित्रांची निवड 'गुगल'वर सर्च देऊन केली जाते. गेल्या पाच वर्षात त्यात दहा पटीने वाढ झाली आहे, असे वॉल स्ट्रीट जनरलच्या वृत्तात म्हटले आहे.



### नववर्ष संदेशांचा विक्रम

**यंदाच्या नववर्षादिनानिम्मित भारतात तब्बल २० अब्ज शुभेच्छा संदेशाची देवाणघेवाण झाली. हा विक्रम असून, इतर कोणत्याही देशात अकते संदेश पाठवले गेले नाहीत, असे व्हॉट्सअॅपचे म्हणणे आहे.**

# कल्याणमध्ये 'पद्मावत' सुरु असलेल्या चित्रपटगृहाबाहेर फेकला पेट्रोल बॉम्ब

## राजपूत करणी सेनेचा देशभरात चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यासाठी धुडगूस




**ठाणे - दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या 'पद्मावत' या बहुचर्चित चित्रपटावरुन देशभरात वाद पेटला आहे. राजपूत समाजाच्या कडव्या करणी सेनेने देशभरात या चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यासाठी धुडगूस घातला. याचाच एक भाग म्हणजे ठाण्यातील कल्याणमध्ये शनिवारी भानुसागर चित्रपटगृहात पद्मावतीचा शो सुरु असताना अचानक बाहेर रात्री ९ वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात लोकांनी पेट्रोल बॉम्ब फेकले. या घटनेत कुठलीही हानी झालेली नाही. पोलीस या प्रकाराची अधिक चौकशी करीत आहेत.**

राजपूत संघटनांनी भन्साळीवर पद्मावत चित्रपटातून इतिहासाची मोडतोड केल्याचा आरोप केला आहे. मात्र, हा चित्रपट पाहणाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, चित्रपटात असे कुठलेही वादग्रस्त चित्रण करण्यात आलेले नाही ज्यामुळे राजपूत समाजाच्या भावना दुखावतील. दरम्यान, करणी सेनेने शनिवारी सांगितले की, जर त्यांच्याकडे पद्मावत सिनेमाचे हक्क देण्यात आले तर, या चित्रपटाच्या खर्चाची रक्कम द्यायला आम्ही तयार आहोत. तसेच त्यांनी पद्मावत चित्रपटावरून देशभरात झालेल्या हिंसाचाराची जबाबदारी घेण्यासही नकार दिला आहे.

करणी सेनेचे प्रमुख लोकेंद्रसिंह काल्वी यांनी सांगितले की, त्यांच्या संघटनेतील सदस्यांचा किंवा इतर कुठल्याही अन्य क्षत्रिय संघटनांच्या सदस्यांचा शाळेच्या बसवर केलेल्या हल्ल्यामध्ये कोणाचाही सहभाग नव्हता. बुधवारी हरयाणाच्या गुरुग्राममध्ये २०-२५ शाळेच्या मुलांना घेऊन जाणाऱ्या बसवर हल्ला झाला होता. चित्रपटाला विरोध करण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी अनेक वाहनांना आग लावत सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केले होते.

(पृष्ठ १ वरुन)














# हिंदू हृदय सम्राट श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म दिवसाच्या निमित्त मिरभाईंदरमध्ये 'आश्रय ट्रस्ट' संस्थेद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन

फ्रेंडशिप बेंड या ९ फेब्रुवारी ला प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटाचे नायक श्रीनेश शहा उपस्थित होते त्याच प्रमाणे शाहीर दत्ताराम म्हात्रे यांनी शाहिरी पोवाड्यात श्रीमान बाळासाहेब ठाकरे शिवाजी महाराज अश्या थोर माणसांवर पोवाडे गायिले यावेळी आश्रय ट्रस्टचे सर्व पदाधिकारी तसेच श्री सुनील गोडसे, श्री प्रदीप सामंत, श्री संतोष जाधव, आशिष राय आणि सर्व जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात हजार होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)